Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18850576

# समाजसुधारणा चळवळीतील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

**पवन चंद्रशेखर साठे.**[1] & **प्रोफेसर डॉ. बी. डी. जाधवर**[2]

**प्रस्तावना**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय समाज हा विविध सामाजिक संकटांनी ग्रस्त होता. जातिव्यवस्थेवर आधारित सामाजिक रचना, अस्पृश्यतेसारखी अमानवी प्रथा, स्त्री-दास्य, अंधश्रद्धा, शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक विषमता यांमुळे समाजातील मोठा वर्ग मुलभूत मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. सामाजिक विषमतेमुळे बौद्धिक, सांस्कृतिक आणि नैतिक उन्नतीही खुंटली होती. या परिस्थितीत भारतीय समाजाला आधुनिकतेकडे नेण्यासाठी समाजसुधारणेची आवश्यकता प्रकर्षाने जाणवू लागली.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात समाजसुधारणा चळवळीने विशेष वेग घेतला. महात्मा जोतिराव फुले यांनी शूद्र-अतिशूद्रांच्या शिक्षणाचा पाया घातला. न्यायमूर्ती रानडे आणि गोपाळ गणेश आगरकर यांनी विवेकवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक समतेचा विचार मांडला. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराज यांनी राजकीय व संस्थात्मक पातळीवर सामाजिक न्यायाची अंमलबजावणी केली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संघर्षात्मक, राजकीय आणि कायदेशीर मार्गाने अस्पृश्यता निर्मूलन व मानवी हक्कांचे संरक्षण केले. या सर्व सुधारकांनी आपल्या कार्यातून भारतीय समाजाला समतावादी आणि न्यायाधिष्ठित करण्याचा प्रयत्न केला.

या समाजसुधारणा परंपरेत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे स्थान वेगळे आणि महत्त्वपूर्ण आहे. शिंदे यांचे कार्य केवळ भावनिक सहानुभूती किंवा तात्कालिक उपायांपुरते मर्यादित न राहता, दीर्घकालीन आणि संस्थात्मक सामाजिक परिवर्तनावर केंद्रित होते. त्यांनी अस्पृश्यतेचा प्रश्न केवळ सामाजिक अन्याय म्हणून न पाहता, त्यामागील धार्मिक आणि नैतिक कारणांचा शोध घेतला.

अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी शिंदे यांनी शिक्षण, धार्मिक सुधारणा आणि सामाजिक समन्वय या तीनही पातळ्यांवर सातत्यपूर्ण कार्य केले. १९०६ साली स्थापन केलेल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या माध्यमातून त्यांनी शाळा, वसतिगृहे, प्रौढ शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचे उपक्रम राबविले. त्याचबरोबर, संवाद, विवेक आणि नैतिक जागृती यांच्या

---

1

2 इतिहास विभाग प्रमुख, बलभीम महाविद्यालय, बीड

आधारे समाजपरिवर्तन साध्य होऊ शकते, असा समन्वयवादी दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य भारतीय समाजसुधारणा चळवळीत एक महत्त्वपूर्ण वैचारिक दुवा ठरते.

**उद्दिष्टे**

1. महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीचा ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट करणे.
2. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचा सविस्तर अभ्यास करणे.
3. वि.रा.शिंदे यांचे समाजसुधारणेतील योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधनासाठी **वर्णनात्मक आशय विश्लेषण संशोधन पद्धती** वापरण्यात आली आहे.

**विठ्ठल रामजी शिंदे : जीवन आणि वैचारिक जडणघडण**

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी जमखंडी येथे झाला. प्रारंभी त्यांचे शिक्षण धार्मिक वातावरणात झाले. पुढे त्यांनी इंग्लंडमध्ये जाऊन **युनिटेरियन धर्मविचारांचा अभ्यास** केला. या अनुभवामुळे त्यांच्या विचारांना मानवतावादी आणि समतावादी अधिष्ठान लाभले. त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर बुद्धिवाद, मानवतावाद, धर्मसुधारणा,पाश्चात्त्य समाजातील सामाजिक समता यांचा खोल प्रभाव दिसून येतो.

**सामाजिक सुधारणा**

अस्पृश्यता ही केवळ सामाजिक विषमतेची समस्या नसून ती धार्मिक अधिष्ठान लाभलेली, शतकानुशतके रूढ झालेली व्यवस्था होती. धर्मग्रंथांच्या परंपरागत व संकुचित व्याख्यांमुळे अस्पृश्यतेला पवित्रतेचे स्वरूप देण्यात आले होते आणि त्यामुळे सामाजिक भेदभाव अधिक दृढ झाला होता. या पार्श्वभूमीवर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रश्न केवळ सामाजिक सुधारणा म्हणून न पाहता, त्याचा धार्मिक स्तरावरही सखोल विचार केला. त्यांनी धर्मग्रंथांची पुनर्व्याख्या करताना समता, बंधुता आणि मानवमूल्यांचा आधार घेतला व धर्माचा उपयोग सामाजिक अन्याय टिकवून ठेवण्यासाठी नव्हे, तर तो दूर करण्यासाठी व्हावा, हा विचार प्रभावीपणे मांडला.

वैचारिक भूमिकेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत शिंदे यांनी १९०६ साली डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून अस्पृश्य समाजातील मुलांसाठी शाळा सुरू करण्यात आल्या, वसतिगृहांची उभारणी करण्यात आली, प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविण्यात आले तसेच व्यावसायिक प्रशिक्षणाच्या उपक्रमांची आखणी करण्यात आली. शिक्षण, कौशल्यविकास आणि आत्मसन्मान या माध्यमांतून उपेक्षित समाजघटकांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणणे, हा या मिशनचा मूलभूत उद्देश होता.

त्या काळातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचा विचार करता, अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाठी आणि उन्नतीसाठी अशा स्वरूपाचे संघटित कार्य करणे हे अत्यंत धाडसी व क्रांतिकारी ठरते. परंपरावादी समाजव्यवस्थेच्या विरोधाला सामोरे जात शिंदे यांनी धार्मिक पुनर्विचार आणि सामाजिक कृती यांचा समन्वय साधून समाजसुधारणा चळवळीला नवी दिशा दिली. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य अस्पृश्यता निर्मूलनाच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण टप्पा मानले जाते.

वि. रा. शिंदे यांचा ठाम विश्वास होता की, “शिक्षणाशिवाय सामाजिक गुलामगिरीचा अंत होऊ शकत नाही.” त्यांनी शिक्षणाला आत्मसन्मानाचे साधन, सामाजिक चळवळीचे अस्त्र, आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग म्हणून पाहिले. दलित समाजातील शिक्षणप्रसारात त्यांचे योगदान मोलाचे आहे. शिंदे यांचे मुख्य कार्य अस्पृश्यता निर्मूलनाशी निगडित असले, तरी विधवा विवाह, स्त्री शिक्षण, स्त्रियांचे सामाजिक स्वातंत्र्य या विषयांवरही त्यांनी पुरोगामी भूमिका घेतली. समाजसुधारणा ही सर्वसमावेशक असली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

शिंदे यांनी धर्माला सामाजिक समतेचे साधन मानले. त्यांनी कर्मकांडावर टीका करून नैतिक धर्मावर भर दिला. त्यांनी मानवधर्माची संकल्पना मांडली. त्यामुळे त्यांचे विचार पारंपरिक धार्मिक चौकटीपलीकडे असल्याचे निदर्शनास येते. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्यामुळे सामाजिक समतेची जाणीव निर्माण झाली.तसेच दलित शिक्षणाचा पाया घातला गेला. याबरोबरच पुढील चळवळींना वैचारिक दिशा मिळाली. आजही सामाजिक न्यायाच्या चर्चेत त्यांचे विचार संदर्भ म्हणून वापरले जातात.

विठ्ठल रामजी शिंदे यांचा दृष्टिकोन हा सामाजिक व धार्मिक सुधारणांवर आधारित, समन्वयवादी स्वरूपाचा होता. त्यांनी समाजातील विविध घटकांमध्ये संवादाद्वारे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. इतर समाजसुधारकांच्या तुलनेत शिंदे यांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा दृष्टिकोन वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण होता. त्यांनी अस्पृश्यतेला केवळ सामाजिक अन्याय म्हणून न पाहता, ती धर्माच्या चुकीच्या व्याख्यांमधून निर्माण झालेली विकृती आहे, असे ठामपणे मांडले. शिंदे यांनी प्रतिपादन केले की वेद किंवा उपनिषदे यांसारख्या प्राचीन धार्मिक ग्रंथांमध्ये अस्पृश्यतेचे स्पष्ट समर्थन आढळून येत नाही. त्यांच्या मते, मूळतः कर्मावर आधारित असलेली वर्णव्यवस्था कालांतराने जन्माधिष्ठित बनली आणि याच प्रक्रियेमुळे सामाजिक विषमता आणि अस्पृश्यतेसारख्या अमानवी प्रथा दृढ झाल्या. धर्माच्या प्रचलित व्याख्यांनाच आव्हान देत अशा प्रकारची मांडणी करणे, हे त्या काळातील परंपरावादी सामाजिक वातावरणात अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारी मानले जाते.

शिंदे यांच्या सार्वजनिक कार्यपद्धतीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आंदोलनात्मक आणि संघर्षात्मक मार्गाऐवजी संवाद, वैचारिक चर्चा आणि संस्थात्मक कार्यावर अधिक भर दिला. त्यांनी टोकाचा संघर्ष टाळत समाजातील सर्व घटकांना परिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला. लेखन, व्याख्याने, परिषदांमधील चर्चा

तसेच डिप्रेस्ड क्लासेस मिशनसारख्या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा मार्ग निवडला. शिंदे यांचा असा विश्वास होता की उच्चवर्णीय समाजातील लोकांची नैतिक जाणीव जागृत केली, तर ते स्वतःहून अस्पृश्यतेसारख्या प्रथा सोडून देतील आणि समाजात समतेचा मार्ग खुला होईल. ही समन्वयवादी भूमिका पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेल्या अधिक संघर्षात्मक, राजकीय आणि कायदेशीर मार्गापेक्षा भिन्न ठरते. त्यामुळे शिंदे यांची कार्यपद्धती भारतीय समाजसुधारणा चळवळीतील एक स्वतंत्र आणि विचारप्रवर्तक प्रवाह म्हणून ओळखली जाते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समाजसुधारणात्मक कार्याची इतर प्रमुख समाजसुधारकांच्या कार्याशी तुलना केल्यास भारतीय समाजसुधारणा चळवळीचे बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. महात्मा जोतिराव फुले यांनी शूद्र-अतिशूद्र समाजाच्या शिक्षणावर विशेष भर देत सामाजिक विषमतेविरुद्ध लढा दिला. शिक्षणाच्या माध्यमातून उपेक्षित वर्गांचे सशक्तीकरण करणे, हे उद्दिष्ट फुले आणि शिंदे या दोघांमध्ये समान दिसून येते. शिंदे यांनी धर्मसुधारणेच्या माध्यमातून समाजपरिवर्तन साधण्याचा प्रयत्न केला.

बाबासाहेब आंबेडकर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे दोघेही अस्पृश्यता निर्मूलन व सामाजिक समतेच्या चळवळीतील महत्त्वाचे विचारवंत असले, तरी त्यांच्या वैचारिक भूमिकांमध्ये मूलभूत मतभेद आढळून येतात. या दोन विचारवंतांमधील फरक अभ्यासनीय ठरतो, कारण त्यांनी समान समस्येकडे भिन्न मार्गांनी पाहिले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांचा मार्ग स्वीकारत, समाजपरिवर्तन साध्य करता येईल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी धर्मसुधारणेच्या माध्यमातून समन्वयवादी भूमिका घेत जातीय विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मत्याग करून राजकीय व कायदेशीर संघर्षाचा मार्ग अवलंबला. तथापि, या वैचारिक भिन्नतेनंतरही दोघांचे अंतिम उद्दिष्ट एकच होते, ते म्हणजे भारतीय समाजात सामाजिक समता, मानवी प्रतिष्ठा आणि न्याय प्रस्थापित करणे.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेल्या प्रयत्नातून ग्रामीण भागात दलित मुलांच्या शाळा सुरू झाल्या. सामाजिक संवाद वाढला व जातीअंतर्गत भीती कमी होण्यास मदत झाली. जरी बदल संथ होता, तरी तो शाश्वत होता. वि.रा.शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता हा राष्ट्रीय प्रश्न मानला. सामाजिक न्यायाचा मुद्दा राजकीय चर्चेत आणला. यामुळे स्वातंत्र्यलढ्याला सामाजिक आशय मिळाला. आधुनिक इतिहासकारांच्या मते शिंदे यांचे कार्य “मध्यममार्गी” असले तरी त्याने पुढील क्रांतिकारी चळवळींसाठी भूमी तयार केली म्हणून त्यांचे योगदान संक्रमणकालीन पण अत्यावश्यक ठरते. आजही शिंदेंचा मानवतावादी दृष्टिकोन मार्गदर्शक ठरतो.

महाराष्ट्राची समाजसुधारणा परंपरा ही संत चळवळीपासून सुरू होऊन आधुनिक काळातील सामाजिक क्रांतीपर्यंत विस्तारलेली आहे. संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांनी सामाजिक समतेचे बीज रोवले; फुले दांपत्याने त्याला संघटित स्वरूप दिले; तर विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्या विचारांना संस्थात्मक आणि नैतिक चौकट प्रदान केली. शिंदे यांचे स्थान या परंपरेत फुल्यांच्या विचारांचा संवेदनशील वारसदार, आंबेडकरपूर्व दलित चळवळीचा वैचारिक पाया, धर्मसुधारणा आणि सामाजिक न्याय यांचा समन्वयक म्हणून महत्त्वाचे ठरते.

"महर्षी" ही उपाधी शिंदेंना त्यांच्या नैतिक जीवनशैली, त्याग आणि तत्त्वनिष्ठ समाजसेवेमुळे प्राप्त झाली. त्यांनी कोणतेही वैयक्तिक राजकीय पद स्वीकारले नाही तसेच संपत्ती किंवा सत्ता यांचा मोह धरला नाही. सामाजिक कार्यालाच जीवनाचे अंतिम ध्येय मानले. या गुणांमुळे त्यांची ओळख केवळ कार्यकर्ते नव्हे, तर नैतिक मार्गदर्शक म्हणून झाली.

वि.रा.शिंदे यांना अनेकदा शिक्षित मध्यमवर्गाकडून अपेक्षित पाठबळ मिळाले नाही. कारण अस्पृश्य प्रश्न "अस्वस्थ करणारा" मानला जात होता. सामाजिक प्रतिष्ठेचा धोका वाटत होता. तत्कालीन समाजात सुधारणा केवळ वैचारिक मर्यादेत ठेवण्याची प्रवृत्ती होती. तरीही शिंदे यांनी या वर्गाशी संवाद तोडला नाही. हीच बाब त्यांच्या समन्वयवादी नेतृत्वाची ओळख आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या वैचारिक जडणघडणीत इंग्लंडमधील *युनिटेरियन* मानवतावादी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. युनिटेरियन परंपरेत मानवी विवेक, नैतिक स्वातंत्र्य आणि धार्मिक सहिष्णुता यांना विशेष महत्त्व दिले जाते. शिंदे यांनी या विचारांना भारतीय सामाजिक वास्तवाशी सुसंगत स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. मानवी हक्क ही संकल्पना त्यांनी केवळ राजकीय अधिकारांपुरती मर्यादित न ठेवता, सामाजिक सन्मान, शिक्षणाचा हक्क आणि समान मानवी प्रतिष्ठा यांशी जोडली. विवेकवादाच्या आधारे त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि धार्मिक कर्मकांडांवर टीका केली, तर धार्मिक सहिष्णुतेच्या माध्यमातून विविध धर्म, जाती व समुदाय यांच्यात समन्वय निर्माण करण्याचा आग्रह धरला. त्यामुळे शिंदे यांचे विचार स्थानिक सामाजिक समस्यांवर आधारित असले, तरी त्यांचा आशय आणि मूल्यव्यवस्था वैश्विक मानवतावादी स्वरूपाची ठरते.

भारतीय स्वातंत्र्यलढा केवळ ब्रिटिश सत्तेपासून राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यापुरता मर्यादित राहू नये, ही शिंदे यांची ठाम आणि मूलभूत भूमिका होती. त्यांच्या मते, जर समाजातील बहुसंख्य लोक सामाजिक गुलामगिरीतच अडकून राहिले, तर राजकीय स्वातंत्र्य अर्थहीन ठरेल. "सामाजिक गुलामगिरी टिकवून राजकीय स्वातंत्र्य अपूर्ण आहे," हे त्यांचे प्रतिपादन त्या काळातील राष्ट्रीय चळवळीत एक महत्त्वपूर्ण वैचारिक हस्तक्षेप ठरतो. त्यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा एकत्रित विचार मांडत राष्ट्रीय चळवळीला सामाजिक न्यायाची दिशा देण्याचा प्रयत्न केला. हा विचार पुढे भारतीय संविधानातील सामाजिक न्याय, मूलभूत हक्क आणि समतावादी मूल्यांमध्ये प्रतिबिंबित झालेला दिसतो.

वि.रा. शिंदे यांचे योगदान सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने मूलभूत आहे. आज समाजशास्त्र, इतिहास आणि सामाजिक कार्य अभ्यासक्रमात शिंदेंचे कार्य स्वतंत्रपणे अभ्यासले जाणे आवश्यक आहे. यामुळे सुधारणेचे बहुआयामी स्वरूप समजण्यास मदत होईल.

**संशोधनात्मक निरीक्षणे**

1. शिंदे यांचे कार्य नैतिक-सामाजिक परिवर्तनावर केंद्रित होते.
2. त्यांनी संघर्षापेक्षा संवादाला प्राधान्य दिले.
3. त्यांचे योगदान दीर्घकालीन आहे.
4. आधुनिक सामाजिक न्याय चळवळींसाठी शिंदेंचे विचार मार्गदर्शक ठरतात.

**निष्कर्ष**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीतील मानवतावादी विवेकाचे प्रतिक होते. त्यांनी जातीय अन्यायाविरुद्ध लढताना द्वेषाऐवजी नैतिकता, संघर्षाऐवजी समन्वय, आणि क्रांतीऐवजी परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला.

त्यांचे कार्य हे कदाचित तात्काळ क्रांतिकारक वाटणार नाही; परंतु इतिहासाच्या दीर्घ पटावर ते मूलभूत आणि अपरिहार्य ठरते. सामाजिक न्यायाच्या आजच्या संघर्षात शिंदेंचे विचार हे मार्गदर्शक दीपस्तंभासारखे आहेत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीचे नैतिक शिल्पकार होते. त्यांनी संघर्ष आणि समन्वय यामधील मध्यम मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचा पाया घातला. त्यांचे कार्य हे तत्कालीन मर्यादांमध्ये राहूनही दूरगामी परिणाम घडवणारे ठरले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीतील सेतू व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी परंपरा आणि परिवर्तन यांच्यात समन्वय साधत सामाजिक क्रांतीचा मार्ग प्रशस्त केला. त्यांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून आजच्या सामाजिक समतेच्या लढ्यालाही प्रेरणादायी आहे.

**संदर्भसूची**


- आगलावे, प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन, २०००.
- शिंदे, वि.,रा., माझा जीवनप्रवास, पुणे, १९३३.
- देशपांडे, महाराष्ट्रातील समाजसुधारणा, पुणे, २००२.
- कीर,ध., महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन १९७१.
- Omvedt, G., *Dalits and the Democratic Revolution.* Sage, 1994.
- Zelliot, E., *From Untouchable to Dalit,* 1992.


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*